# संवेदनशील ठिकाणी बंदोबस्तात वाढ!

## पहेलगाम हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर शहरात सतर्कतेचे आदेश

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काश्मीरमधील पहेलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर शहर परिसरात सतर्कतेचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. शहरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली असून, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केले आहे.**

पहेलगाम येथे मंगळवारी (२२ एप्रिल) दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २७ पर्यटक मृत्युमुखी पडले. त्यामध्ये पुण्यातील दोघांचा समावेश आहे. त्यांचे पार्थिव मंगळवारी रात्री पुण्यात आणण्यात येणार आहे. यापार्श्वभूमीवर शहरात सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत. मंगळवारी रात्रीपासून शहरातील संवेदनशील भागातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांनी शहरातील घडामोडींवर नजर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. समाज माध्यमात प्रसारित होणारे संदेशावर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. समाज माध्यमातून अफवा प्रसारित केल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, तसेच काही अनुचित घटना घडल्यास त्वरीत पोलीस नियंत्रण कक्षाशी (क्रमांक ११२) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दहशतावादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले कौस्तुभ गनबोटे, संतोष जगदाळे यांचे पार्थिव सायंकाळी विमानाने पुण्यात आणण्यात येणार आहे. गनबोटे कोंढव्यातील साईनगर



परिसरात वास्तव्यास होते. जगदाळे कर्वेनगर भागात वास्तव्यास होते. कर्वेनगर, कोंढवा परिसरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.पुणे शहर आणि जिल्ह्यातून जम्मू-कश्मीरमध्ये विविध ठिकाणी एकूण २६४ पर्यटक फिरायला गेले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाला उपलब्ध झाली आहे. या पर्यटकांना आणण्यासाठी प्रयत्न सुरू असून, त्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने ही माहिती देण्यात आली. जम्मू- काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात २७ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. जम्मू-काश्मिरमध्ये पुणे आणि जिल्ह्यातून काही पर्यटक स्वतंत्रपणे, तर काही सहल नियोजन करणाऱ्या कंपन्यांच्या माध्यमातून पर्यटनासाठी गेले आहेत. त्यांची माहिती मिळविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून काल रात्रीच हेल्पलाइन सुरू करण्यात आली. या हेल्पलाइनवर आलेल्या दूरध्वनींनुसार, शहर आणि जिल्ह्यातील एकूण ३५४ पर्यटक गेल्याची माहिती जिल्हा प्रशासनाला मिळाली आहे.दरम्यान पुण्यातील एकूण पर्यटकांपैकी दोन पर्यटकांचा मृत्यू झाला असून, दोन महिला पर्यटक जखमी आहेत, असे जिल्हा प्रशासनाच्या यादीत नमूद आहे. उर्वरित सर्व पर्यटक सुखरूप असून, त्यांच्याशी संपर्क साधण्यास जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यांना पुण्यात आणण्यासाठीचेही नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे प्रमुख विठ्ठल बनोटे यांनी दिली.

### शहरात सतर्कतेचे आदेश

पहेलगाम येथे मंगळवारी (२२ एप्रिल) दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २७ पर्यटक मृत्युमुखी पडले. त्यामध्ये पुण्यातील दोघांचा समावेश आहे. त्यांचे पार्थिव मंगळवारी रात्री पुण्यात आणण्यात येणार आहे. यापार्श्वभूमीवर शहरात सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत. मंगळवारी रात्रीपासून शहरातील संवेदनशील भागातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांनी शहरातील घडामोडींवर नजर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. समाज माध्यमात प्रसारित होणारे संदेशावर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. समाज माध्यमातून अफवा प्रसारित केल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# रस्त्यांवरील खोदकामामुळे ५० ठिकाणी कोंडी

## ठेकेदारांविरुद्ध कारवाई करण्याचा अमोल झेंडे यांनी दिला इशारा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील वेगवेगळ्या भागात रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, मलनिस्सारण वाहिनीचे कामे सुरू आहेत. महापालिकेच्या ठेकेदारांकडून ही कामे करण्यात येत असून, संबंधित कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करावीत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही कामे न केल्यास ठेकेदारांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिला आहे.**

शहर परिसरात गेल्या तीन महिन्यांपासून वेगवेगळ्या भागात रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, तसेच मलनिस्सारण वाहिनीची कामे सुरू आहेत. भूमिगत गॅस वाहिनीचे काम काही भागात सुरू आहे. महापालिकेने संबंधित कामे ठेकेदारांना दिली आहेत. ठेकेदारांनी ही कामे वेळेत



करणे गरजेचे आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महिन्यात शहरातील वेगवेगळ्या भागात खोदकामामुळे ५० ठिकाणी कोंडी झाल्याचे वाहतूक शाखेने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे, असे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी सांगितले.

याबाबत शहरातील वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षकांना सूचना देण्यात आल्या आहेत. खोदकाम सुरू असल्याने योग्य पद्धतीने वाहतूक नियोजन झाले नाही. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली. ही बाब गंभीर आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही कामे पूर्ण करावीत. रस्ते पुन्हा सुस्थितीत करण्यात यावेत. ३१ मे पूर्वी ही कामे पूर्ण न झाल्यास ठेकेदारांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याबाबत वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदारांना नोटीस बजावून कामे वेळेत पूर्ण करण्याची सूचना द्यावी, असे पोलीस उपायुक्त झेंडे यांनी नमूद केले.शहर परिसरात गेल्या तीन महिन्यांपासून वेगवेगळ्या भागात रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, तसेच मलनिस्सारण वाहिनीची कामे सुरू आहेत. भूमिगत गॅस वाहिनीचे काम काही भागात सुरू आहे. महापालिकेने संबंधित कामे ठेकेदारांना दिली आहेत. ठेकेदारांनी ही कामे वेळेत

### योग्य पद्धतीने वाहतूक नियोजन नाही

पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही कामे न केल्यास ठेकेदारांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिला आहे.याबाबत शहरातील वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षकांना सूचना देण्यात आल्या आहेत.खोदकाम सुरू असल्याने योग्य पद्धतीने वाहतूक नियोजन झाले नाही. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली. ही बाब गंभीर आहे.

करणे गरजेचे आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महिन्यात शहरातील वेगवेगळ्या भागात खोदकामामुळे ५० ठिकाणी कोंडी झाल्याचे वाहतूक शाखेने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे, असे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी सांगितले.

याबाबत शहरातील वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षकांना सूचना देण्यात आल्या आहेत. खोदकाम सुरू असल्याने योग्य पद्धतीने वाहतूक नियोजन झाले नाही. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली. ही बाब गंभीर आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही कामे पूर्ण करावीत. रस्ते पुन्हा सुस्थितीत करण्यात यावेत. ३१ मे पूर्वी ही कामे पूर्ण न झाल्यास ठेकेदारांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याबाबत वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदारांना नोटीस बजावून कामे वेळेत पूर्ण करण्याची सूचना द्यावी, असे पोलीस उपायुक्त झेंडे यांनी नमूद केले.शहरातील वेगवेगळ्या भागात रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, मलनिस्सारण वाहिनीचे कामे सुरू आहेत. महापालिकेच्या ठेकेदारांकडून ही कामे करण्यात येत असून, संबंधित कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करावीत.